P-21

<u>राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये सुधारणा</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक यशदा-२०२१/प्र.क्र.४४/१२-अ**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
दिनांक:- २२ सप्टेंबर, २०२२.

<u>वाचा:-</u> १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.यशदा २०१७/प्र.क्र.१२९/१७/१२-अ, दि.१५.०३.२०१८
३) संचालक, रा.प्र.नि.मु.यं., यशदा पुणे यांचे पत्र क्र. राप्रनिमूयं-२०२१-२१/साप्रवि-पव्य/ प्र.क्र.३-१६५, दि.१२.०३.२०२१
४) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.टीआरएन २०२१/प्र.क्र.२३/२१/१२-अ, दि.१५.०३.२०२१.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता विचारात घेऊन, संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबी आणि सद्य:स्थितीत सुरू असलेला कोव्हीड-१९ या आजाराचा प्रादुर्भाव यानुषंगाने प्रस्तुत राज्य प्रशिक्षण धोरण सुधारीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

संदर्भाधीन दि.१५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विविध प्रशिक्षण बाबींवर निर्णय घेण्यासाठी आणि विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचा आकृतीबंध निश्चित करण्यासाठी महासंचालक, यशदा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.

तसेच संदर्भाधीन दि.१५.०३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना द्यावयाच्या प्रशिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा) सा.प्र.वि. यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय अभ्यास समिती गठीत केली होती. महासंचालक यशदा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीतील निर्णयानुषंगाने प्राप्त झालेला यशदाचा संदर्भाधीन प्रस्ताव आणि अ.मु.स. (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास समितीच्या बैठकांमध्ये घेतलेले निर्णय विचारात घेऊन सदरहू प्रशिक्षण धोरण सुधारीत करण्याचे विचाराधीन होते.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. :-

१. १) शासन निर्णय दि.२३.०९.२०११ च्या परिच्छेद क्र.२.३ (ब) नुसार गट-क करीता पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणाचा कालावधी एक आठवडा आहे. <u>त्याऐवजी सदर कालावधी दोन आठवडे असा निश्चित करण्यात येत आहे.</u>

२) शासन निर्णय दि.२३.०९.२०११ चा परिच्छेद क्र. २.३ (क) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.:-

<u>उजळणी प्रशिक्षण:-</u> पायाभूत प्रशिक्षण किंवा पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षणानंतर सात वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत शासकीय कर्मचारी त्याचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल. उजळणी प्रशिक्षणानंतर सात वर्ष कालावधी पूर्ण होईपर्यंत शासकीय कर्मचारी पदोन्नत न झाल्यास, त्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत तो पुन्हा उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल.

सदर उजळणी प्रशिक्षणाचा कालावधी गट "अ", "ब" आणि "क" साठी पाच दिवस तर गट "ड" साठी तीन दिवस असा निश्चित करण्यात येत आहे.

२. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार विविध टप्प्यांवरील प्रत्यक्ष प्रशासकीय प्रशिक्षणाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सध्या सुरु असलेला कोव्हीड २०१९ आजाराचा प्रादुर्भाव तसेच शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने अत्यावश्यक परिस्थितीमध्ये संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण संस्थांमध्ये उपस्थित होण्यासाठी कार्यमुक्त करणे शक्य न होणे या बाबी आणि डिजिटल क्षेत्रात सातत्याने होणारी प्रगती विचारात घेऊन आवश्यकतेनुसार डिजिटल माध्यमातून ऑनलाईन/ब्लेंडेड (Online/ Blended) स्वरुपातील प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी सदर प्रशिक्षण कालावधीचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील.:-

(१) <u>पायाभूत प्रशिक्षण कालावधी -</u>

गट अ - एकूण कालावधी सहा आठवडे पैकी किमान चार आठवडे प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-ब - एकूण कालावधी सहा आठवडे पैकी किमान चार आठवडे प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-क - एकूण कालावधी दोन आठवडे पैकी किमान एक आठवडा प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-ड - एकूण कालावधी एक आठवडा असून हे संपूर्ण प्रशिक्षण प्रत्यक्षरित्याच अनुज्ञेय राहील.

(२) <u>पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण कालावधी -</u>

गट अ - एकूण कालावधी दोन आठवडे पैकी किमान एक आठवडा प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-ब - एकूण कालावधी दोन आठवडे पैकी किमान एक आठवडा प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-क - एकूण कालावधी दोन आठवडे असून किमान एक आठवडा प्रत्यक्ष प्रशिक्षण व उर्वरीत कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण देता येईल.

गट-ड - एकूण कालावधी तीन दिवस असून संपूर्ण प्रशिक्षण प्रत्यक्षरित्याच अनुज्ञेय राहील.

३. शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून प्रशिक्षणाची परिणामकारकता वाढविण्याच्या अनुषंगाने यशदा खालीलप्रमाणे विविध उपाययोजना /कार्यवाही करील.:-

(१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या दर्जेदार प्रशिक्षण संस्थांशी सामंजस्य करार करुन यशदाने कमी कालावधीचे ऑनलाईन पध्दतीचे अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्तावांची पडताळणी करावी. तसेच विशिष्ट विषय/अभ्यासक्रमासाठी नामांकित प्रशिक्षण संस्था/ विद्यापीठांमधील गुणवत्ता प्राप्त प्रशिक्षक प्रशिक्षणासाठी अतिथी प्रशिक्षक म्हणून उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करावी.

(२) राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत प्रशासकीय प्रशिक्षणाची अध्यापन पध्दती परस्पर संवादी व परिणामकारक होण्यासाठी प्रशिक्षण सत्र सुरु होण्याच्या २ ते ३ आठवडे आधी प्रशिक्षणसंबंधीत विषयांचे साहित्य संबंधीत प्रशिक्षणार्थींना ऑनलाईन स्वरुपात पाठविण्यात यावे. याकरीता यशदाने डिजीटल प्लॅटफॉर्म तयार करावा.

(३) केंद्र शासनाच्या Integrated Government Online Training (IGOT) प्लॅटफॉर्मवर उपलब्ध विविध ऑनलाईन प्रशिक्षण पर्यायांचा समावेश प्रशासकीय प्रशिक्षणामध्ये करण्यात यावा.

(४) कर्मचाऱ्यांच्या ज्ञान व कौशल्य वृध्दीसाठी त्यांना वैयक्तिक स्तरावर ऑनलाईन प्रशिक्षण घेता यावे याकरीता विविध महत्वाच्या विषयांच्या ई-लर्निंग (E-learning) प्रशिक्षण व्हिडीओंची लायब्ररी यशदाने विकसीत करावी व डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करुन द्यावी. शासन सेवेतील विविध संवर्गातील कर्मचारी/ अधिकारी यांच्या प्रशिक्षण गरजांचे नियमित विश्लेषण करुन सदर व्हिडिओ लायब्ररी दरवर्षी अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.तसेच याबाबत शासनाच्या विविध विभागांना वेळोवेळी अवगत करण्यात यावे व प्रसिध्दी देण्यात यावी.

(५) शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशासकीय कामकाजात लागणाऱ्या बाबींविषयी सतत उपयुक्त सहाय्य मिळेल याकरीता अशा प्रकारची विविध विषयांचे मार्गदर्शन करणारी यंत्रणा यशदाने तयार करावी अणि यशदामध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांना आवश्यक ज्ञान व माहितीच्या उपलब्धतेकरीता आवश्यक संसाधनांचे संग्रहालय (Repository) असावे.

(६) राज्यातील महत्वाच्या प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे , महाविद्यालये यांच्या समन्वयाने यशदा, राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत घोषीत विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था यांचे नियमित प्रशिक्षण विषयक परीक्षण (Training Audit) करेल.

(७) प्रशिक्षण संस्थांत विविध विषय, अभ्यासक्रम, याबाबत अद्यावत प्रशिक्षण देता यावे याकरीता यशदाने नामांकित व दर्जेदार प्रशिक्षण संस्था/ विद्यापीठे/ महाविद्यालये यांच्याशी सामंजस्य करार (M.O.U.) करण्याची कार्यवाही करावी.

(८) दरवर्षी यशदाने प्रशासकीय प्रशिक्षणात समावेश करावयाच्या सामाईक विषयांची विविध प्रशासकीय विभागांशी सल्लामसलत करुन आखणी करावी. तसेच प्रशासकीय प्रशिक्षणाचा वार्षिक आराखडा तयार करताना सर्व विभागांच्या गरजांबाबत सल्लामसलत करुन आवश्यक नियोजन करावे. शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून यशदाने प्रशासकीय प्रशिक्षणाबरोबरच विभागांच्या तांत्रिक प्रशिक्षण गरजांच्या अनुषंगानेही आवश्यक साहित्य निर्मितीसाठी सक्रिय सहभाग द्यावा.

(९) यशदाने विविध शासकीय धोरणांची आखणी करणारे शासन यंत्रणेतील मंत्रालयीन अधिकारी आणि सदर शासकीय धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त प्रशिक्षण सत्राचे नियमितपणे वर्षातून किमान एकदा आयोजन करावे.

(१०) यशदाने, विशेष उल्लेखनीय काम (Best Practices) केलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रकल्प/ कामकाजाची चित्रफित (डॉक्युमेंटरी) तयार करुन डिजिटल प्लॅटफॉर्मव्दारे त्याचा समावेश प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रमात करावा.

(११) ऑनलाईन प्रशिक्षण तसेच ऑनलाईन प्रशिक्षण साहित्य निर्मितीकरीता सर्व विभागांना सहाय्य व्हावे याकरीता यशदाने सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना प्रसृत कराव्यात, तसेच ऑनलाईन प्रशिक्षण व ऑनलाईन प्रशिक्षणाकरीता साहित्य निर्मितीबाबत विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून राज्य प्रशिक्षण कृती दलासमोर सादर करावा. तसेच यशदाने प्रशासकीय प्रशिक्षणाबरोबरच विभागांच्या तांत्रिक प्रशिक्षण गरजांच्या अनुषंगानेही आवश्यक साहित्य निर्मितीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा.

(१२) प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण (TNA Analysis) क्षमताचा विकास यासाठी यशदामध्ये स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभारण्यात यावी.

(१३) राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणाऱ्या गोपनीय अहवालांमध्ये (PAR) अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी आवश्यक क्षेत्रांबाबत शिफारशीं नमूद असल्याने सदर बाब प्रशिक्षण कार्यक्रमाशी संलग्न करण्यात यावी.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२२०९२२१६१०२३१७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=522242e2259dbf8fc1aed336674ebf6138607b16aacbb ed00301a9e43c62f6c7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=783CA332598C7E1C28393EA543FA05D9FE77F3 6A848F4738D12288E105699F4, cn=LEENA ASHISH SANKHE
Date: 2022.09.22 16:13:24 +05'30'

(लिना संखे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२. महालेखापाल महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
३. महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई.
४. महालेखापाल महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर.
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन भवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
१०. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव.
११. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव.
१२. मा.मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक.
१३. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१५. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११००७
१६. सर्व विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था/ सर्व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था
१७. उप सचिव, साप्रवि/१२-अ यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१८. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये/प्रशिक्षण संस्था
१९. निवड नस्ती (१२-अ), साप्रवि, मंत्रालय, मुंबई.